# बहुजन दर्शन

*बहुजन, लोकविद्या, सामान्य जीवन, पंचायत, स्वराज, कला (नैतिकता) यांचे परस्पर संबंध बहुजन दर्शनात प्रवेश करण्याचा एक मार्ग उघडतात. या दिशेने खालील वाक्ये मदत करू शकतात हैं.*

**सुनील सहस्त्रबुद्धे**

1. बहुजनांचे ज्ञान म्हणजे लोकविद्या. बहुजन समाज म्हणजे लोकविद्येचे माहेर.
2. बहुजनांचे जीवन म्हणजे सामान्य जीवन. सामान्य जीवनाची दिशा बहुजन समाजाच्या मूल्यांच्या माध्यमातून समजू शकते.
3. बहुजनांचे संवाद आणि निर्णयाचे स्थान म्हणजे पंचायत. पंचायत सांगते की सर्वानुमतीचे तत्त्व म्हणजेच बहुजनांत निर्णय-प्रक्रियेचा आदर्श होय.
4. बहुजनांच्या शासन–प्रशासनाचा आदर्श म्हणजे स्वराज. स्वराज बहुजनांची आध्यात्मिक आणि लौकिक निर्मिती होय.
5. बहुजनांच्या सर्व क्रिया कला / भावांनी परिपूर्ण असतात. भाव-प्रधान तर्क हा बहुजनांचा तर्क-प्रकार होय.
6. लोकविद्या हे सामान्य जीवनाचे मार्गदर्शक ज्ञान होय. सामान्य जीवन हे लोकविद्येचे माहेर होय.
7. आपल्या नीती-प्रधान व भाव-प्रधान पिंडामुळे लोकविद्या पंचायतीचा ज्ञानाधार ठरते; पंचायत लोकविद्येला श्रेष्ठ ज्ञानाचा दर्जा देते.
8. लोकविद्येत स्वराज चा ज्ञानाधार असतो. स्वराज लोकविद्येचे स्थूल रूप होय.
9. लोकविद्या कला / भाव सापेक्ष असते आणि तिच्यातील तर्क भाव-प्रधान असतो. (लोक)कला ही लोकविद्येचेच एक रूप आहे.
10. सामान्य जीवनात पंचायतीला सहज स्वीकृती आहे. पंचायत हे सामान्य जीवनाचेच एक अंग आहे.
11. प्रत्येक सामाजिक घटकाची स्वायत्तता हा सामान्य जीवनात स्वराज चा सामाजिक आधार होय. स्वराज म्हणजे सामान्य जीवनाच्या अंतर्गत विसंगती / अंतर्विरोध सोडवण्याची क्षमता असणारा शासन प्रकार होय.
12. सामान्य जीवनातील प्रत्येक क्रिया भावपूर्ण आणि नीति-सापेक्ष असते. कला सामान्य जीवनाच्या प्रत्येक आयामात भिनलेली असते.
13. पंचायत स्वराज मध्ये अंतर्भूत असलेली स्वायत्तता आणि सामुदायिकता अधोरेखित करते. स्वराज टिकवण्यासाठी नियम–संयम पाळण्याची जबाबदारी पंचायत पार पाडते.
14. पंचायत नैतिक ताकदीचे रूप होय. नैतिक-सामाजिक निर्णयाचे स्थान म्हणजे पंचायत.
15. स्वराज ही अशी विचारसरणी आणि व्यवस्था आहे ज्यात प्रत्येक घटना किंवा क्रिया नीति-सापेक्ष असते. ज्ञान-जगात जेव्हा कलेचे स्थान सर्वोच्च असते तेव्हा स्वराज एक नैसर्गिक अवस्था म्हणून मान्यता पावते.